जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 JUL 2021
लोकमत

# विद्यापीठाकडून परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महापुराच्या नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी सत्रातील (मार्च-एप्रिल २०२१) परीक्षांचे अर्ज भरण्यास शिवाजी विद्यापीठाने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरण्याची मुदत दि. ३० जुलैपर्यंत राहणार आहे. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागांनी परीक्षा अर्जांना ऑनलाईन मान्यता देण्याची मुदत दि. ३१ जुलैपर्यंत, तर महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या तयार करण्याची मुदत दि. ३ ऑगस्टपर्यंत असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 JUL 2021
तरुण भारत

# परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** अस्मानी संकटामुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिल २०२१ उन्हाळी परीक्षांचे अर्ज विद्यार्थ्यांना वेळेत भरता आलेले नाहीत. त्यामुळे हे परीक्षा अर्ज भरण्यास विद्यापीठ प्रशासनाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी नियमित शुल्कासह ३० जुलैपर्यंत परीक्षा अर्ज भरून महाविद्यालय किंवा अधिविभागांकडे जमा करावयाचा आहे. महाविद्यालय किंवा अधिविभागांनी परीक्षा अर्जांच्या याद्या विद्यापीठ प्रशासनाकडे ३ ऑगस्टपर्यंत नियमित शुल्कासह जमा करावयाच्या आहेत, तरी विद्यार्थ्यांनी वेळेत आपला परीक्षा अर्ज भरावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.